| MHAM060027152024 | म.कौ.हिं.का.अर्ज क्र.१०५/२०२४<br>निशाणी क्र.०५ खालील आदेश<br>(घोषित दिनांक १३ नोव्हेंबर, २०२५) |
|---|---|

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी महिलांचे घरगुती हिंसाचारापासुन संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३(२) अन्वये अंतरीम पोटगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांचे प्रस्तुत अर्जातील कथनाप्रमाणे त्यांचा व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह दिनांक १९/०७/२०१० रोजी संपन्न झाला व त्यानंतर अर्जदार या गैरअर्जदार यांच्याकडे व्यंकटेश नगर, दारवा येथे नांदणेस गेल्या.

३. अर्जदार यांच्या कथनाप्रमाणे, त्यांना गैरअर्जदार क्र.१ यांनी घरातुन दिनांक ०३/०५/२०२४ रोजी हकलुन दिले. तेव्हा पासुन अर्जदार या त्यांच्या माहेरी राहतात. अर्जदार यांचे वडीलांनी लग्नामध्ये रक्कम रुपये ४,००,०००/- खर्च केल्यामुळे त्यांची आर्थिक परीस्थिती जमेची नसल्याने त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अर्जदार या त्यांच्या वडीलांकडे राहत असल्याने अर्जदार यांचे पालनपोषणाचा वा औषधोपचाराचा तसेच कपडे-लत्याचा खर्च अर्जदार यांचे वडीलांना सोसावा लागत आहे. अर्जदार यांच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाहीत. गैरअर्जदार यांनी अर्जदार यांना घरातुन हकलुन दिल्यामुळे अर्जदार यांचे सर्व स्वप्ने भंगली आहेत.

४. गैरअर्जदार क्र.१ हे कंत्राटदार, सिवील बिल्डींग, घर, बंगले इत्यादी चे उच्च दर्जाचे काम करतात व त्यांचे दरमहा उत्पन्न १,२५,०००/– इतके आहे. तसेच गैरअर्जदार यांच्याकडे बागायत शेती आहे. त्यातुन देखील त्यांना रक्कम रुपये दहा लाख वार्षिक उत्पन्न मिळते. त्यांच्यावर कोणत्याही सदस्यांची जबाबदारी नाही. गैरअर्जदार यांचे सर्व सोयींनीयुक्त वातानुकूलीत घर आहे. त्यांच्याकडे चार चाकी व दोन चाकी तीन गाड्या आहेत. त्यामुळे गैरअर्जदार यांचे राहणीमानाची सुसंगत असे अर्जदाराचे राहणीमान ठेवण्याकरीता अर्जदार यांना दरमहा आरोग्य, कपडा–लत्ता व राहण्याकरीता तसेच दैनंदिन गरजा भागविणेकरीता रक्कम रुपये ३५,०००/– अंतरिम पोटगी मिळणे गरजेचे आहे. तरी प्रस्तुतचा अर्ज मंजुर करावा अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

५. प्रस्तुत अर्जास गैरअर्जदार क्र.१ तर्फे नि.क्र.२७ येथे म्हणणे दाखल करुन तीव्र विरोध दर्शविलेला आहे. गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदार सोबत विवाह झाल्याची बाब नाकारलेली नाही. परंतु इतर सर्व कौटुंबिक हिंसाचाराची कथने नाकारलेली आहेत. गैरअर्जदार यांच्या कथनाप्रमाणे त्यांना अर्जदार यांचेपासुन विवाह संबंधातुन यमुना, चेतना व शुभम ही तीन मुले झालेली असुन ती गैरअर्जदार क्र.१ सोबतच राहतात. अर्जदार हिने साधारण १४ वर्ष गैरअर्जदार क्र.१ सोबत चांगला संसार केला. परंतु कोणतेही संयुक्तीक कारण नसतांना गैरअर्जदार अथवा त्यांचे कुटूंबीयांना कोणतीही माहिती, सुचना न देता दिनांक ०३/०५/२०२४ रोजी गैरअर्जदार क्र.१ यांचे अनुपस्थितीत त्या माहेरी अचलपुर येथे सर्व दागदागिने घेवुन निघुन गेल्या. त्यानंतर गैरअर्जदार यांनी त्यांचा शोध घेतला परंतु त्या मिळुन

आल्या नाहीत म्हणुन त्यांनी पोलीस ठाणे दारवा येथे अर्जदार या बेपत्ता असल्याबाबत दिनांक ०४/०५/२०२४ रोजी तक्रार देखील दिली. त्यानंतर गैरअर्जदार हे अर्जदार यांचे माहेरी त्यांना आणण्यासाठी गेले असता अर्जदार व त्यांचे आई, वडील व भाऊ यांनी आम्ही अर्जदार यांना पाठविणार नाही असे सांगितले. गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदार यांना वेळोवेळी नांदवणेस येणे साठी प्रयत्न केला परंतु अर्जदार यांनी त्यास नकार दिला. त्यानंतर दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, दारवा या न्यायालयात त्यांनी अर्जदार यांनी नांदायला येण्यासाठी एच.एम.पी.क्र.११६/२०२४ दाखल केला व तो प्रलंबित आहे. अर्जदार यांनी महिला समुपदेशन केंद्र, अचलपुर यांच्याकडे तक्रार दाखल केलेली होती त्यामध्ये देखील गैरअर्जदार यांनी त्यांना नांदणेस येण्याची विनंती केली परंतु तेथे देखील अर्जदार यांनी नकार दिला. त्यामुळे अर्जदार या त्यांच्या स्वइच्छेने माहेरी राहत आहेत. त्यांनी कोणतेही कारण नसतांना गैरअर्जदार व त्यांच्या अपत्यांचा त्याग केलेला आहे. त्यामुळे त्या अंतरीम पोटगी मिळणेस पात्र नाहीत असे गैरअर्जदार यांनी कथन केले.

६. गैरअर्जदार क्र.१ हे गावातील इंगोले ठेकेदार यांच्याकडे बांधकाम देखरेखीचे काम करत असुन त्यांना दरमहा १२,०००/– रुपये पगार मिळतो. गैरअर्जदार क्र.१ यांचेवर त्यांची वृद्ध आई यांची जबाबदारी असुन त्यांची तीन मुले यमुना, चेतना व शुभम यांचे पालनपोषण, उदरनिर्वाह, कपडे–लत्ता, औषधोपचार व शिक्षण या खर्चांची देखील जबाबदारी आहे. याउलट अर्जदार या ब्युटी पार्लर तसेच मेहंदी क्लास घेत असुन त्यांना मोठमोठे लग्नांमध्ये ऑर्डर मिळतात. त्या

शारीरिकदृष्ट्या सक्षम असुन त्यांना दरमहा २५ ते ३० हजार इतके उत्पन्न मिळते. त्यामुळे उपरोक्त सर्व कारणांचा विचार करुन अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करावा अशी त्यांनी विनंती केली.

७. प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील गैरअर्जदार क्र.१ यांचे म्हणणे तसेच संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदार व गैरअर्जदारतर्फे सन्माननिय विधिज्ञ यांचा सखोल युक्तीवाद ऐकला.

८. प्रस्तुत अर्जातील मागण्यांचा विचार करता, खालील वादप्रश्न या न्यायालयाचे विचारार्थ उत्पन्न झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष खालील नमुद कारणांसाठी त्यापुढे नमुद करण्यात आलेले आहेत.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे, गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांनी, त्यांच्या विरुद्ध घरगुती हिंसाचार केला काय ही बाब प्रथमदर्शनी सिध्द करते का ? | अंशत: होकारार्थी. |
| २. | अर्जदार हे मागणीप्रमाणे पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास किती ? | अंशत: होकारार्थी. |
| ३. | काय आदेश ? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

**<u>का र ण मि मां सा</u>**

**<u>वादप्रश्न क्र.१ ते ३ साठी :–</u>**

९. महिलांचे घरगुती हिंसाचारापासुन संरक्षण अधिनियम, २००५ चे

कलम २३(२) च्या प्रकाशात या न्यायालयास जर अर्जदारांनी प्रथमदर्शनी अर्जदार ही घरगुती हिंसाचाराची बळी असल्याचे सिध्द केल्यास प्रस्तुतच्या अर्जात मागणी केल्याप्रमाणे अंतरिम पोटगीचा आणि संरक्षण आदेश पारीत करता येतो. अधिनियमाच्या कलम ३(३) मध्ये देण्यात आलेल्या घरगुती हिंसाचाराच्या व्याख्येप्रमाणे "महिलेस शारीरिक किंवा मानसिकरित्या नुकसान किंवा इजा पोहचेल किंवा तिच्या जिवीतास किंवा सुरक्षिततेस धोका निर्माण होईल असे कोणतेही कृत्य किंवा कोणतेही वर्तन" घरगुती हिंसाचार ठरतो. यापुढे जावुन अधिनियमाच्या कलम ३(३) च्या स्पष्टीकरणाच्या प्रकाशात क्लेश, धमकी, अनाचार, हुंडा किंवा संपत्तीची मागणी, शारीरिक शोषण, मानसिक शोषण, आर्थिक शोषण, भावनात्मक शोषण इत्यादींचा समावेश देखील घरगुती हिंसाचाराच्या व्याख्येत येतो. त्यामुळे अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जाची गुणवत्ता वर नमुद व्याख्येच्या प्रकाशात तपासणे गरजेचे ठरते.

१०. प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचे लग्न झालेले असुन ते अस्तित्व असलेची बाब विवादीत नाही. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांना लग्नसंबंधातुन यमुना, चेतना व शुभम ही मुले आहेत ही बाब विवादीत नाही. अर्जदार या सध्या त्यांच्या माहेरी राहतात ही बाब देखील विवादीत नाही.

११. अर्जदार यांचा मुळ अर्ज, प्रस्तुतचा अर्ज आणि शपथपत्राप्रमाणे गैरअर्जदार यांनी त्यांचा विविध प्रकारे छळ केलेला आहे व त्यांना दिनांक ०३/०५/२०२४ रोजी रक्कम रुपये पाच लाखाची मागणी करुन घरातुन हकलुन

दिलेले आहे. त्यांची पालनपोषणाची काहीही सोय केलेली नाही. गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदारतर्फे करण्यात आलेल्या कथनांचा स्पष्टपणे इन्कार केलेला आहे व अर्जदार या स्वमर्जीने कोणत्याही कारणाशिवाय माहेरी राहत असल्याचे कथन केलेले आहेत.

१२. गैरअर्जदारातर्फे सन्माननिय विधिज्ञ यांनी युक्तीवाद केला की, कोणत्याही ठोस कारणाशिवाय अर्जदार या माहेरी राहत असल्याने त्यांना पोटगी मागण्याचा कोणताही अधिकार नाही. तसेच त्या कोणालाही न सांगता मुलांना सोडुन माहेरी राहत आहेत. याउलट अर्जदारतर्फे युक्तीवाद केला की, त्यांना गैरअर्जदार यांनी रक्कम रुपये पाच लाखाची मागणी करुन मारझोड करुन घरातुन हकलुन दिलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांना नाइलाजास्तव माहेरी राहावे लागत असुन गैरअर्जदार क्र.१ यांनी त्यांचे पालनपोषणाची कोणतीही व्यवस्था केलेली नाही.

१३. अभिलेखाचे अवलोकन केले असता, अर्जदार यांच्या कथनाप्रमाणे त्यांना लग्नानंतर पहिले पाच ते सहा महिने गैरअर्जदार यांनी चांगले नांदवल्यानंतर वेळोवेळी गैरअर्जदार यांनी त्यांचा मानसिक व शारीरिक छळ केला तसेच दिनांक ०३/०५/२०२४ रोजी मारझोड करुन शिवीगाळ करुन रक्कम रुपये पाच लाखासाठी घरातुन बाहेर काढुन दिले. अर्जदार सदरची बाब न्यायालयात शपथपत्राद्वारे कथन करतात. अर्जदारतर्फे त्यांना झालेल्या शारीरिक व मानसिक छळ प्रथमदर्शनी अभिलेखावर नि.क्र.०८/१ ते ४ येथे त्यांचा वैद्यकीय दस्तऐवज

तसेच नि.क्र.२६ येथे प्रथम खबरी अहवाल क्र.३००/२०२४ व दोषारोपाची प्रत दाखल केलेली आहे. सदर दस्तऐवजांचे बारकाईने अवलोकन केले असता अर्जदार क्र.१ ते ३ यांनी दिनांक ०२/०५/२०२४ रक्कम रुपये पाच लाखाची मागणीसाठी घरातुन शारीरिक व मानसिक छळ करुन हकलुन दिल्याबाबत प्रथम खबरी अहवाल व दोषारोपपत्र दाखल झाले असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते.

१४. अर्जदार या स्वइच्छेने कोणत्याही कारणाशिवाय माहेरी राहतात का, त्यांचा कौटुंबिक छळ झाल्याने त्यांना माहेरी राहणे भाग पडत आहे ही बाब प्रस्तुत प्रकरणाच्या पुराव्याअंती शाबीत होणार आहे. परंतु सद्यस्थितीस अभिलेखावर अर्जदारतर्फे दाखल करण्यात आलेल्या दस्तऐवजांचा व अर्जदार यांचे शपथपत्राचा विचार करता प्रथमदर्शनी गैरअर्जदार पासुन अर्जदार या वेगळ्या राहत असल्याचे बाब प्राथमिकदृष्ट्या सिध्द होते. नांदणेस येणेसाठी प्रकरण दाखल केले म्हणजे अर्जदार यांना गैरअर्जदार यांनी कौटुंबिक हिंसाचार केला नाही असा निष्कर्ष प्रथमदर्शनी काढता येणार नाही. कोणतीही भारतीय स्त्री कोणत्याही ठोस कारणाशिवाय तिचा संसार, पती व मुले यांना सोडुन व त्यांचा त्याग करुन माहेरी राहत नाही. त्यामुळे सदरची बाब ही पुराव्याअंती स्पष्ट होणार आहे. अद्याप सदर गैरअर्जदार यांनी दाखल केलेल्या नांदायला येणेबाबतच्या प्रकरणाचा निर्णय होणे बाकी आहे त्यामुळे केवळ त्या कारणावरुन अर्जदार या स्वत:हुन कोणत्याही कारणाशिवाय माहेरी जातात असा प्रथमदर्शनी निष्कर्ष नोंदविता येणार नाही. अभिलेखावर प्रथमदर्शनी सद्यस्थितीस अर्जदार यांचे शपथपत्र, प्रथम खबरी अहवाल व दोषारोपपत्र यावरुन अर्जदार यांचा कौटुंबिक छळ झाला असल्याचे

प्रथमदर्शनी दिसुन येते. तसेच गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार यांचे पालनपोषण केले नाही हे देखील स्पष्ट होते. निश्चितपणे सदरची बाब देखील घरगुती हिंसाचाराच्या व्याख्येत बसते. इतर गैरअर्जदार यांनी अर्जदार यांचेवर हिंसाचार केला आहे अथवा नाही ही बाब पुराव्याअंती स्पष्ट होणार आहे. त्यामुळे त्या बाबत सद्यस्थितीस कोणताही निष्कर्ष नोंदविणे योग्य होणार नाही.

१५. अर्जदार यांचे कथनाप्रमाणे, गैरअर्जदार क्र.१ हे कंत्राटदार असुन त्यांना दरमहा १,२५,०००/- एवढे उत्पन्न येते त्याच बरोबर त्यांना बागायत शेतीमधुन देखील प्रतीवर्षी दहा लाख उत्पन्न येते. परंतु अर्जदारतर्फे गैरअर्जदाराचे उत्पन्नाचे कुठलेही दस्तऐवज अभिलेखावर दाखल केलेले नाही. अर्जदारतर्फे केवळ गैरअर्जदार क्र.१ हे कंत्राटदार असल्याबाबत विझीटींग कार्ड अभिलेखावर दाखल केलेले आहे. गैरअर्जदार क्र.१ हे कंत्राटदार असल्याची बाब गैरअर्जदारतर्फे जरी युक्तीवादामध्ये मान्य केली असली तरी त्यांचे युक्तीवादाप्रमाणे गैरअर्जदार क्र.१ यांना ठेकेदारीचे कोणतेही काम येत नाही. गैरअर्जदारतर्फे देखील अर्जदार यांना उत्पन्नाचा स्त्रोत असलेबाबत त्यांचे म्हणण्यातील कथनाशिवाय अभिलेखावर कोणताही प्रथमदर्शनी पुरावा दाखल केलेला नाही. वर नमुद दोन्ही बाजुंच्या वतीने करण्यात आलेल्या परस्पर विरोधी कथनांच्या प्रकाशात येथे नमुद करणे गरजेचे आहे की, जरी वादाकरीता गैरअर्जदार क्र.१ यांना उत्पन्नाचा कोणताही स्त्रोत नाही असे जरी समजले तरी ते शारीरिकदृष्ट्या सक्षम असुन त्यांचे पत्नी यांचे पालनपोषणाची जबाबदारी नाकारु शकत नाही. त्याच वेळी हे देखील लक्षात घेणे गरजेचे आहे की, पोटगीची तरतुद ही अर्जदार यांचे पालनपोषणासाठी करायची असुन गैरअर्जदार

क्र.१ यांची आर्थिक परीस्थिती सिध्द झालेशिवाय भरघोस रक्कमेची पोटगी दिलेस ती फक्त गैरअर्जदार यांना शिक्षा देणेसाठीच होईल व त्याचा उपयोग अर्जदार यांना होणार नाही.

१६. अभिलेखावरुन हे स्पष्ट होते की, गैरअर्जदार हे शारीरिकदृष्ट्या सक्षम आहे. गैरअर्जदार यांच्या मालमत्ता व उत्तरदायीत्व प्रतिज्ञालेखाप्रमाणे त्यांना दहमहा १२,०००/– रुपये उत्पन्न मिळते. अर्जदार व गैरअर्जदार यांची तीन मुले ही गैरअर्जदार यांच्याकडेच राहतात. अर्जदार यांनी दरमहा रक्कम रुपये ३५,०००/– पोटगीची मागणी केलेली आहे. परंतु अर्जदार यांचे राहणीमान, जिवनावश्यक वस्तुंच्या किंमती, औषधोपचाराचा खर्च, कपडे–लत्ते, उभयपक्षकार यांचे राहणीमान तसेच गैरअर्जदार क्र.१ यांना त्यांची तीन मुले यांची असलेली जबाबदारी या सर्वांचा विचार करुन गैरअर्जदार क्र.१ यास अर्जदार यांना दरमहा अर्ज दाखल तारखेपासुन रक्कम रुपये सहा हजार इतकी अंतरिम पोटगी देणेबाबत आदेशित करणे न्यायोचित ठरेल. त्यामुळे हे न्यायालय वादप्रश्न क्र.१ व २ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे व वादप्रश्न क्र.३ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## <u>आ दे श</u>

१. अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज अंशत: मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.१ यास अर्ज दाखल तारखेपासुन ते पुढील आदेशापर्यंत अर्जदार यांना दरमहा ६,०००/– (सहा हजार रुपये) अंतरिम पोटगी देणेबाबत आदेशीत करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत आदेशाची प्रत अर्जदार यांना मोफत देण्यात यावी.

Digitally signed by DESHPANDE CHAITANYA SUNILDATTA
Date: 2025.11.14 17:12:04 +05'30'

ठिकाण : अचलपुर (सी.एस.देशपांडे)
दिनांक : १३/११/२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. २, अचलपुर.

## C E R T I F I C A T E : -

I affirm that the contents of this P.D.F. file, order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Pratiksha G. Uike |
| Court Name | :- | Shri. C.S.Deshpande,<br>2nd Jt. Civil Judge (J.D.) and<br>J.M.F.C., Achalpur |
| Date of decision | :- | 13.11.2025 |
| Judgment signed by PO. on | :- | 13.11.2025 |
| Judgment uploaded on | :- | 13.11.2025 |